दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक २९२ वा मंगळवार दि.३० एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# समाजा समाजात भांडणे लावून महाराष्ट्रातील सामाजीक सलोखा बिघडवणाऱ्या भाजपाला या निवडणूकीत धडा शिकवा

अहमदपूर / प्रतिनिधी :- समाजा समाजात भांडणे लावून स्वताची पोळी भाजप भरीत आहे, त्यामुळे आज राज्यातील सामाजीक सलोखा बिघडत चालला आहे. धनगर, मराठा या समाजाला आरक्षण देतो म्हणून विदयमान सरकारने फसवले आहे, आता हे सगळे उघड झाले आहे. त्यामुळे आता त्यांच्या भुलाथापांना बळी न पडता काँग्रेस महाविकास आघाडीला सर्व समाजाने पाठींबा दयावा, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेव होळकर यांचे वंशज भूषणसिंह राजे होळकर यांनी केले आहे. लातूर लोकसभा मतदार संघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ सोमवार दि. २९ एप्रिल रोजी दुपारी अहमदपूर तालुक्यातील खंडाळी येथे आयोजीत सभेत लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार भूषणसिंह राजे होळकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख त्याच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री विनायकराव पाटील, लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी, अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे निरीक्षक माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, अहमदपूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. गणेश कदम, एन.आर.पाटील चंद्रकांत मद्दे, रामभाऊ बेल्लाळे, सिराज जहागीरदार, भारत रेड्डी, सोमेश्वर कदम, ज्योतीताई पवार, निलेश देशमुख, डॉ. सतीश बिराजदार, आर.डी शेळके, भाग्यश्री क्षिरसागर सांब महाजन, व्यंकटराव पाटील, श्रीकांत बनसोडे, हरिभाऊ येरमे, मारुती माने, अशोक पाटील आदींसह काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व मान्यवरांनी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी बोलतांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज भूषणसिंह राजे होळकर म्हणाले की, आज देशाची परिस्थिती पाहताना आम्हाला वाटले आज लोकांबरोबर उतरण्याची गरज आहे. महाराष्ट्राची भूमी ही वारकऱ्यांची आहे, तसेच ही भूमी धारकऱ्यांची ही आहे. छत्रपती शिवाजी महाराज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी जनतेची कामे करण्याची शिकवण दिली. जनतेला केंद्रस्थानी मानून अनेक नेत्यांनी काम केले. परंतु आज राजकारणात एकमेकांना शत्रू म्हणून पाहिले जाते. सन २०१४ मध्ये पंतप्रधान मोदी म्हणाले अच्छे दिन





आने वाले है परंतु ते आले नाहीत. सुशिक्षित बेरोजगारांना दोन कोटी रोजगार त्यांनी दिले नाही. सरकार नुसते गाजरे दाखवते. शेतकऱ्यांची कर्जमाफी पंतप्रधान मनमोहन सिंग व कृषिमंत्री शरद पवार यांच्या काळात झाली. भाजपने रामाच्या नावावर राजकारण न करता कामावर राजकारण करावे असे सांगून भाजप नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी धनगर समाजाला आरक्षण देतो म्हणाले पण त्यांनी ते दिले नाही. आरक्षणासाठी काही काम त्यांनी केले नाही. धनगर समाजासाठीच्या शासकीय योजनांचा लोकांना फायदा होत नाही. धनगर समाजासाठी काहीही भाजपने केले नाही, ते फक्त ओबीसी समाज मराठा समाजात भांडणे लावण्याचे काम करतात. कर्नाटक राज्यात काँग्रेसने धनगर समाजाचे सिद्धरामय्यांना मुख्यमंत्री केले असे देश विरोधी घोटाळेबाज भाजप सरकार तडीपार करा, जनतेने आपले प्रश्न सोडवण्यासाठी येत्या ७ मेला लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या नावासमोरील हात चिन्हाचे बटन दाबून त्यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. देशात व राज्यात सत्ता बदल घडणार आहे डॉ. शिवाजी काळगे निवडून आल्यावर पहिले पत्र लिंबोटी धरणाच्या जल उपसा सिंचन योजनेच सरकारला जाणार आहे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, अहमदपूर तालुक्यात विकासाची खूप कामे आपल्याला करायची आहेत. सिंचनाचा मुद्दा येथेमहत्त्वाचा आहे, लिंबोटी धरणापासून उपसा जलसिंचन योजना खंडाळी परिसरात राबवली पाहिजे ही लोकांची मागणी आहे, देशात व राज्यात सत्ता बदल घडणार आहे, खंडाळी परिसराच्या उपसा जलसिंचन योजना तत्वतः मी मंजूर करतो. लवकरच याच सर्वेक्षण संबंधितांनी करावे डॉ शिवाजी काळगे यांचे खासदार म्हणून निवडून आल्यावर पहिले पत्र लिंबोटी धरणाच्या जल उपसा सिंचन योजनेच सरकारला जाणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी आमदार देशमुख बोलताना ते म्हणाले की, भाजप सरकारने शेतीमालाला भाव दिला नाही. केंद्रात राज्यात भाजपचे सरकार आहे, ते शेतकऱ्यांची उत्पन्न दुप्पट का करत नाहीत. त्यांनी कडधान्य खाद्यतेल पेंड आयात केली, काँग्रेसने असे पूर्वी कधी केले नाही. काँग्रेसने जनतेला गॅरंटी कार्ड दिले आहे, कर्नाटक तेलंगणात काँग्रेस गॅरंटी कार्डची अंमलबजावणी चालू आहे. उसाच्या संदर्भात अहमदपूर येथे राजकारण आहे, आम्ही उसाच्या बाबतीत कधी राजकारण केले नाही. मांजरा परिवाराची गट कार्यालय विभाग कार्यालय येथे करू त्यामध्ये सर्वांनी ऊस नोंदी कराव्यात. राज्यात भ्रष्टाचार वाढला आहे, त्यामुळे सामान्य माणसाची पिळवणूक होतेय. शेतकऱ्याला विहीर, गोठा, गाय म्हैस आदी शासकीय योजना हवी असेल तर पैसे मोजावे लागतात. भाजपने देशातील १६ सरकार पाडली, त्यातील एक महाराष्ट्रातील सरकार होते. काँग्रेसने कधीही फोडा फोडीचे राजकारण केले नाही. काँग्रेसचे निवडून आलेली सरकारे भाजपने फोडली, लोकशाहीवर त्याचा विश्वास नाही, अशा भाजपला धडा शिकवा. ही निवडणूक डॉक्टर विरुद्ध कंत्राटदार आहे, असे सांगून त्यांनी येत्या ७ मेला लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या नावासमोरील हात चिन्हाचे बटन दाबून त्यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. भाजप विरुद्ध भारतीय जनता अशी ही निवडणूक होत आहे माजी मंत्री विनायकराव पाटील माजी मंत्री विनायकराव पाटील म्हणाले की, जनतेने ही निवडणूक हातात घेतली आहे. इंग्रजांपेक्षाही भाजपशाही परवडणारी नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व सामान्यांना मतदानाचा अधिकार दिला आहे. आता भाजपच्या पायाखालची वाळू घसरली आहे, जनता आता या निवडणुकीत त्यांना निवडून देणार नाही, भाजप विरुद्ध भारतीय जनता अशी ही निवडणूक होत आहे. भविष्यात देशात सर्वत्र खाजगीकरण ते करणार आहेत, असे त्यांनी सांगितले. काँग्रेसने कर्नाटक तेलंगणात जे वचन दिले त्याची पूर्तता त्यांनी तेथे केली आहे. भाजप म्हणाले होते आमचे सरकार आले की पहिल्या कॅबिनेट मध्ये धनगर समाजाला आरक्षण देऊ पण त्यांनी धनगर समाजाला आरक्षण दिले नाही. जात धर्म पंथ यांचा विचार न करता सर्वांनी येत्या ७ मेला लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्यानावासमोरील हात चिन्हाचे बटन दाबून मला विक्रमी मताधिक्याने विजयी करावे,असे आवाहन त्यांनी केले.सर्वसामान्यांच्या प्रश्नांच देणे घेणे भाजपला नाही म्हणून हे राज्यकर्ते बदला डॉ. शिवाजी काळगे लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, मागच्या दहा वर्षात भाजप सरकारने सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नाकडे डोळेझाक केली. भाजप खासदार या भागात आले नाहीत या भागासाठी काही काम त्यांनी केले नाही, मी शेतकऱ्यांचा मुलगा आहे. भाजप सरकारने शेतकऱ्यांची अडवणूक पदोपदी केली, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव मिळत नाही. कांदा गुजरातमधून निर्यात होतो, पण महाराष्ट्रातून निर्यात होत नाही. या सरकारला धडा शिकवा काँग्रेसने जनतेला गॅरंटी कार्ड दिले आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांच देणे घेणे भाजपला नाही म्हणून हे राज्यकर्ते बदला असे सांगून येत्या ७ मेला लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या नावासमोरील हात चिन्हाचे बटन दाबून मला विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमात शिवसेनेचे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बालाजी देवकते यांनी केले तर शेवटी आभार मारोती माने यांनी मानले.



लातूर विमानतळावर शिवसेना पक्षप्रमुख उध्दवजी ठाकरे साहेब यांचे स्वागत करताना महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती तथा सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी, जिल्हाप्रमुख बालाजी भाऊ रेड्डी , युवा सेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, रमेश पाटील, शेखर चव्हाण, किशोर जाधव यांनी सत्कार केला

## तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांना चौकशीसाठी दिल्लीला बोलावले

नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या कथित फेक व्हीडीओ प्रकरणी तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवन्थ रेड्डी यांना दिल्ली पोलिसांच्या सायबर युनिटनं नोटीस पाठवली आहे. यासंबंधी चौकशीसाठी त्यांना दिल्लीला बोलावण्यात आले आहे.आरक्षण आणि त्यासंबंधीचा अमित शहांचा एक कथित वादग्रस्त व्हीडीओ नुकताच व्हायरल झाला होता. हा व्हीडीओ फेक असल्याचे काही फॅक्ट चेकमधून समोर आले आहे. हा व्हीडीओ तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवन्थ रेड्डी यांनी आपल्या ट्विटरवरुन शेअर केला होता. त्यामुळे दिल्ली पोलिसांच्या आयएफएसओ युनिट अर्थात सायबर युनिटने रेड्डी यांना समन्स पाठवलें असून १ मे रोजी चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

## फकिरा ब्रिगेड या संघटनेचा महायुतीला जाहीर पाठिंबा



लातूर लोकसभा उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना फकीरा ब्रिगेड या संघटनेचे जाहीर पाठिंबांचे पत्र देताना डावीकडून फकिरा ब्रिगेडचे शहराध्यक्ष अंकुश कांबळे, संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. संजय शिंदे, लातूर लोकसभा उमेदवार खा.सुधाकर शृंगारे, प्रदेश कार्याध्यक्ष प्रा.राजेंद्र लोदगेकर जिल्हाध्यक्ष संजय विरूळे

# रिंकू बनसोडे-थिट्टे प्रकरणी सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या बैठकीतून आंदोलनाचा इशारा

लातूर : रिंकू राम थिट्टे ही मोरगाव ता. बारामती जि. पुणे येथे महावितरण मध्ये वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत होती. ती मुळची लातूर येथील गोविंद बनसोडे यांची कन्या असून पत्रकार रघुनाथ बनसोडे यांची पुतणी होती. पंरतू नाममात्र विज बिला पोटी एका माथेफिरु असलेल्या अभिजीत पोटे यांनी सशस्त्र हल्ला करुन तिची हत्या केली. या संदर्भात लातूर येथील सामाजीक, राजकीय, कार्यकर्त्यानी पत्रकार भवन लातूर येथे बैठक घेवून रिंकू बनसोडे-थिट्टे यांच्यावर हल्ल्याचा निषेध करुन न्याय मागणीसाठी आंदोलन करण्याचा इशारा दिला. सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या बैठकीत एप्रिलच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी दिवा मोर्चा काढून १ मे २०२४ महाराष्ट्र दिन तथा कामगार दिनाच्या निमित्ताने धरणे आंदोलन करुन जिल्हाधिकारी लातूर आणि तत्सम अधिकार्यांना निवेदन देण्याचे ठरले. यावेळी सर्वच राजकीय, सामाजीक पक्षातील कार्यकर्ते, वकिल, प्राध्यपक, पत्रकार, सर्वसामान्य कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी सर्वसामान्य प्रक्रियेतून वस्तूस्तीत प्रसिध्दी पत्रके वाटप करणे, गल्ली, वाड्या मध्ये रिंकू संदभात माहिती देवून रिंकूला न्याय देणे आणि उद्याला कोणा रिंकूवर असा अन्याय अत्याचार होवू नये यासाठी जनजागृती करण्याचे ठरले. या वेळी रिंकूच्या न्याय प्रकरणात ॲड. लहू सुरवसे, ॲड. उदय





गवारे, यांनी कायद्यानुसार आंदोलन करावे, कायदा हातात घेवू नये, अशी भूमीका मांडली. तर श्रीहारी कांबळे, बसवंत अप्पा उबाळे, आणि दिलीप गायकवाड, विनोद कोल्हे यानी न्यायीक दृष्ट्या जशाचतसे उत्तर देणे महत्वाचे वाटते असे स्पष्टीकरण केले. पंरतू कायदा आणि कानून या संदर्भात अडकाटी न आनता प्रविण सोमठाणेकर यांनी रिंकूच्या हत्ते प्रकरणी ठोक भूमीका घेवून उद्याला अशा कोणा रिंकूवर प्रसंग घडू नये या संदर्भात मुद्दा उपस्थित केला असला तरी अनेकानी कायद्याची बाजू घेवून मतदानावर बहिष्कार टाकणे उचिकीचे असल्याचे स्पष्ट केले. पंरतू बहिष्कार आणि मतदानाच्या संदर्भात मार्ग न काढता दिवा मोर्चा, आणि लाक्षणीक धरणे आंदोलनातून निवेदना मार्फत रिंकूला न्याय मिळावा यासाठीचे निर्णयावर बैठकीत सांगता झाली. यावेळी रिंकूच्या नातेवाईका समक्ष माथेफिरु गुन्हेगार अभिजीत पोटे यास कारावासा मधून जलदगती न्यायालयातून फाशीची शिक्षा देण्याची मागणी अनेकानी केली. त्यावेळी उपस्थितांनी साद दिली. यावेळी बहुसंख्येने सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते. दिलीप गायकवाड, विनोद कोल्हे, सिध्दार्थ सुर्यवंशी, रुपेश गायकवाड, सत्यप्रकाश कांबळे, माजी पोलीस निरिक्षक सय्यद सर, प्रा. हर्षवर्धन कोल्हापुरे, पत्रकार काकासाहेब गुट्टे, पत्रकार शिरीषकुमार शेरखाने, मयूर बनसोडे, प्रशात जानराव, सुनील कांबळे, शेखर कांबळे, पत्रकार नितीन चालक, अशोक कांबळे, विनय जागते, सुमित सातपुते, भैय्यासाहेब कांबळे, सीमा बनसोडे, सिध्दार्थ कुसभागे, पवन बनसोडे, निलराज बनसोडे, किशन बनसोडे, अदी उपस्थित होते, तर दुरध्वनीवरुन रिपाईचे चंद्रकांत चिकटे आणि पत्रकार रामराव गवळी, प्रा. युवराज धसवाडीकर यांनी बैठकीस उपस्थित नसलो तरी उद्याच्या न्यायीक आंदोलनात आम्ही सहभागी आहोत, असे स्पष्ट केले.

## संपादकीय....

# पतंग, रेवड्या आणि वास्तव

केंद्र सरकार आजही १४० कोटी लोकांपैकी ८० कोटी लोकांना पाच किलो धान्य मोफत देत आहे. याचा अर्थ देशातील ५७.१४ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. यावरून आपल्याला किती मोठा पल्ला अद्यापही गाठायचा आहे, याची काहीशी कल्पना येऊ शकते. अशी वस्तुस्थिती असतानाही वेगळीच स्वप्ने दाखविली जात आहेत.देशात अमृतकाळ सुरू आहे. याचा अर्थस्वातंत्र्याला पंच्याहत्तर वर्षे झाली आहेत. या सर्वात मोठ्या लोकशाहीतील निवडणुकीचे दोन टप्पे आटोपले. अद्याप पाच टप्प्यांची वाटचाल करावयाची असताना या पर्वात पुन्हा काय काय वाढून ठेवले आहे, याचा अंदाज भल्याभल्यांना आलेला नाही. परंतु गेल्या काही दिवसांत या पर्वात नेत्यांनी उच्चारलेल्या वाणीने भविष्यातील पर्वात उमटणारे कंपन जाणवायला लागले. हे कंपन भयावह आहे. २०४७ मध्ये विकसित भारत करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या देशाची वाटचाल खरेच योग्य मार्गाने सुरू आहे काय? विश्वगुरु होण्याची क्षमता या देशात असेलही; परंतु दोन समाजांत वैमनस्य निर्माण करून कोणत्याही देशाला 'विश्वगुरु' होता येणार नाही. याची जाणीव विश्वगुरुंचा राग आळवणाऱ्या लोकांनाही निश्चितपणे असेल की फक्त महाशक्ती होण्याच्या नावावर देशातील निवडणूकपर्वात विजय मिळवायचा हाच उद्देश आहे, हेही पाहणे गरजेचे ठरते. आतापर्यंत देशात १७ लोकसभा निवडणुका पार पडल्या आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अवघ्या पाच वर्षांनी देशातील ३५ कोटी जनतेने लोकशाही पद्धतीने या देशातील पहिले लोकांनी लोकांसाठी व लोकांचे सरकार निवडले होते. तेव्हा एका परदेशी पत्रकाराने देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना एक प्रश्न विचारला होता. आपल्यासमोरील सर्वात मोठे आव्हान कोणते आहे, हा तो प्रश्न. यावर पं. नेहरू म्हणाले होते, ''या देशातील जनतेला दोन वेळचे अन्न देणे हे माझ्यासमोरचे सर्वात मोठे आव्हान आहे.'' भूक या देशाची सर्वात मोठी समस्या राहिली आहे. आजही केंद्र सरकार १४० कोटी लोकांपैकी ८० कोटी लोकांना पाच किलो धान्य मोफत देत आहे. याचा अर्थ देशातील ५७.१४ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. यावरून आपल्याला किती मोठा पल्ला अद्यापही गाठायचा आहे याची काहीशी कल्पना येऊ शकते.'विश्वगुरू कसे होणार?''दहा वर्षात जे केले तो तर ट्रेलर आहे'', असे सांगणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढील पाच वर्षात देशाला काय देणार आहेत, याची कुणाला काही कल्पना नाही. तरीही 'विश्वगुरु' होण्याचे स्वप्न रंगवायचे का? या देशाचे नेतृत्व करीत असणारे व या देशाची धुरा वाहण्याची आकांक्षा असलेल्या नेत्यांच्या मनात खरेच जनतेच्या विकासाची आस आहे का, असे प्रश्न निर्माण होतात. गेल्या काही दिवसांतील नेत्यांची भाषणे ऐकल्यानंतर निवडणूकपर्वात नाही, तर शिमग्याच्या महिन्यात आहोत की काय असे वाटून जाते. विकसित भारताचे स्वप्न पाहायला हरकत नाही; परंतु वस्तुस्थिती काय दर्शविते. देशातील ८० कोटी लोक मोफत अन्न खात आहेत. देशावर गेल्या दहा वर्षात एक लाख कोटी रुपये कर्ज वाढून ते दीड लाख कोटींवर गेले आहे. गेल्या पाच दशकातील सर्वाधिक बेरोजगारीचा सामना या देशातील युवक करीत आहे. सर्वाधिक कमी दरडोई उत्पन्न असलेल्या देशात या देशाचा समावेश झाला आहे. देशाच्या निर्यातीमध्ये घट होत आहे. देशातील जनतेची क्रयशक्ती कमी कमी होत असताना आपण विकसित भारताचे स्वप्न तरी कशाच्या भरवशावर पाहायचे? सर्व पापांचे खापर ज्या काँग्रेसवर फोडले जाते, त्यांच्या काळात २०१४ मध्ये एका डॉलरची किंमत ६२ रुपये होती. आज दहा वर्षात विश्वगुरु होताना डॉलरची किंमत ८२ रुपये आहे.निवडणूक पर्वात विद्यमान सरकारने गेल्या दहा वर्षांतील विकासकामांचा लेखाजोखा जनतेसमोर मांडून लोकांकडे पुन्हा मतांचा जोगवा मागणे अपेक्षित आहे. परंतु विकासच झाला नसेल तर काय सांगणार, अशी अवस्था आहे. लोकांच्या जगण्याचे, त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि रोजगाराचे प्रश्न महत्त्वाचे आहेत. याच प्रश्नांचे मतदारांना सरकारकडून उत्तर अपेक्षित आहे. परंतु प्रचार कुठे चालला? प्रचारसभांमधून उपस्थित होणारे पुढील शब्द पाहाः मटण, मच्छी, मंगळसूत्र, जय बजरंगबली, नीच आदमी, चोर, इत्यादी. देशातील एका मोठ्या जनसमुदायाला शत्रू मानून देश विकासाची पायरी चढू शकत नाही. देशाला खरेच विकासाच्या मार्गावर न्यायचे असल्यास जनतेच्या प्रश्नांना भिडणे आवश्यक आहे. या देशात इतके प्रश्न आहे की, एकदोन लोकांनी भिडून काहीही होणार नाही. सर्वांना एकत्रित येऊन विकासाची वाट चोखाळावी लागणार आहे.'नया दौर'मधील 'साथी हाथ बढाना, साथी रे...' हे ६० च्या दशकातील चित्रपटातील गाणे त्या विचाराची पेरणी करणारे होते. जनतेच्या भावनेला हात घालून आपले इप्सित साध्य करणाऱ्या लोकांना आता प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. समाजासमाजांत दुही निर्माण करणाऱ्या किंवा एखाद्या व्यक्तीबद्दल अश्लाघ्य शब्दांचा वापर करणाऱ्या वक्तव्यांवर कारवाई होण्याची अपेक्षा आहे. निवडणूक आयोग कदाचित हे काम करणार नाही. परंतु सर्वसामान्य जनतेला विकासाची आस आहे. त्यांना हा प्रचार आवडत नसल्याचे दिसून येत आहे. ज्या पद्धतीने तरुण व महिला सोशल मीडियावर व्यक्त होत आहेत, त्यावरून हेच दिसून येत आहे. काँग्रेसची खैरात तिकडे काँग्रेसही महिलांना लखपती बनविण्याचे अमिष त्यांच्या वचननाम्यात देत आहे. या महिला कोण आहेत? अप्रेंटिसच्या माध्यमातून युवकांना एक लाख रुपये देण्याची योजना युवकांना रोजगार देणारी तरी आहे. त्यातून उत्पादकता निर्माण होण्याची शक्यता आहे. परंतु महिलांना काहीही न करता त्यांना एक लाख रुपये देणे म्हणजे त्या कुटुबांच्या क्रयशक्तीचे काय होणार? त्याऐवजी 'मनरेगा'वर काम करणार्यांच्या मजुरीत वाढ करावी. 'मनरेगा'तील मजुरीवर काम करणाऱ्यांना चारशे प्रतिदिन मजुरी देण्याचे आश्वासन देणारी काँग्रेस मनरेगाची मजुरी का वाढवित नाही? सगळेच पक्ष मोफतचे देऊ म्हणण्याचे आश्वासन देत असतील, तर पुढे शेतीव्यवसायही धोक्यात येणार आहे. प्रसिद्ध समाजसेवक बाबा आमटे यांनी देशातील तरुणाईला दरवर्षी सोमनाथच्या जंगलात भर मे महिन्यातील रखरखत्या उन्हात श्रमाचे महत्त्व पटवून दिले आहे. सगळे तरुण उच्चविद्याविभूषित होते. गरीब आणि श्रीमंत होते. त्यांच्या हस्ते बांधारे बांधण्याचे काम करवून घ्यायचे. 'श्रम ही श्रीराम हमारा' हा मंत्र त्यांनी दिला. बाबांचा हा वसा आजही त्यांचे पुत्र डॉ. विकास आमटे चालवतात. बाबांनी दिलेल्या या मंत्राचे काय होणार? तिथे कुष्ठरोगाने हात पाय गळून पडलेले लोक श्रमाची कामे करतात आणि इकडे हे राजकारणी धष्टपुष्ठ लोकांना केवळ मतांच्या लालसेपोटी फुकट देण्याचे आमिष देऊन त्यांना पंगू करण्याचा डाव रचतात.

# बहुराष्ट्रीय कंपन्यांची जीवघेणी चलाखी

अलीकडच्या काळात बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून केली जाणारी खाद्यपदार्थांमधील हेराफेरी वारंवार उघडकीस येत आहे. सरकारने नुकताच बोर्नव्हिटाची आरोग्यदायी पेय म्हणून जाहिरात करण्यास मनाई करणारा आदेश दिला. नेस्ले या बहुराष्ट्रीय कंपनीच्या अन्यही उत्पादनांमध्ये साखरेचे प्रमाण प्रचंड असल्याचे दिसून आले आहे. विशेष म्हणजे कंपनीने युरोपमधील बाजारपेठांपेक्षा विकसनशील देशांमध्ये कंपनीने साखरेचा जास्त वापर केला आहे.सकस आणि चौकस आहार असणे ही काळाची गरज आहे मात्र अलिकडच्या काळात बाजारात मिळणा-या खाद्यपदार्थातील पोषणाचा दर्जा घसरत असल्याने आणि त्यातही फास्ट फुडचा बोलबाला होऊ लागल्याने आपले आरोग्य धोक्यात आले आहे. प्रामुख्याने तरुणाईत जंकफुडची वाढणारी सवय ही चिंताजनक पातळीवर येऊन ठेपली आहे. विशेषत: बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादनांच्या गुणवत्तेबाबत सातत्याने शंका उपस्थित होत आहेत. या कंपन्या जाहिरातींच्या मा-याने आपली उत्पादने आरोग्यवर्धक असल्याचे सांगत असल्या तरी सत्य बरेचदा वेगळेच असते. अलीकडेच एनर्जी ड्रिंक्स म्हणून ओळखल्या जाणा-या 'बोर्नव्हिटा'मधील साखरेचे असणारे अति प्रमाण उघड झाले असून ते पेय आरोग्यवर्धक श्रेणीतून काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत. घराघरांमध्ये मूल ५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे झाले की त्याला बोर्नव्हिटा, कॉम्प्लॅन यासारखी पेये देण्यासाठी पालकांची जणू स्पर्धाच लागलेली दिसते, अशा पालकांचे डोळे उघडणारे हे पाऊल आहे.अन्नपदार्थाविषयी वाढत्या जागरूकतेमुळे अलिकडेच बहुराष्ट्रीय अन्नपदार्थ उत्पादन कंपन्यांचा खरा चेहरा उघड होत आहे. बोर्नव्हिटा हा लहान मुलांसाठी आरोग्यवर्धक असल्याचे सांगितले जात होते; पण प्रत्यक्षात मुलांनी एकदा प्यायल्यानंतर त्याची गोडी लागावी यासाठी त्यामध्ये अतिरिक्त प्रमाणात साखर मिसळली जात होती. म्हणजेच लहान मुलांना, तरुणांना चटक लावण्याचे कामच उत्पादक कंपनीकडून केले जात होते. त्याची तपासणी केल्यानंतर सरकारने हे पेय आरोग्यववर्धक असल्याचे सांगू नये, अशी तंबी दिली आहे. या आदेशानंतर धक्का बसलेल्या बहुराष्ट्रीय कंपनी नेस्लेने खुलासा करत लहान मुलांसाठीच्या पदार्थांमधील साखरेचे प्रमाण ३० टक्क्यांपर्यंत कमी केल्याचे सांगितले आहे; पण मग इतक वर्षे ही अतिरिक्त शर्करा ज्या मुला-तरुणांच्या शरीरामध्ये गेली असेल त्याचे काय? हा प्रश्न उरतोच. या उत्पादनाची सवय लागावी यासाठीच भारतासह विकसनशील देशांमध्ये या पदार्थात साखरेचे जादा प्रमाण वापरले जात होते, हे निष्पन्न झाले. 'पब्लिक आय' या स्वित्झर्लंडमधील स्वयंसेवी संघटनेने आणि इंटरनॅशनल बेबी फुड ॲक्शन नेटवर्कच्या निष्कर्षात काही धक्कादायक खुलासे झाले होते. यात बोर्नव्हिटामध्ये प्रमाणाबाहेर साखर असल्याचे आढळले होते. नेस्ले कंपनीने युरोपातील बाजाराच्या तुलनेत भारतात आणि अन्य विकसनशील देशात म्हणजेच आफ्रिका, लॅटिन अमेरिकेत अधिक साखर असलेल्या उत्पादनाची विक्री केली. सरकारच्या आदेशानंतर नेल्से इंडियाने आपल्या उत्पादनात ३० टक्क्यांपर्यंत साखर कमी केल्याचा दावा केला. विशेष म्हणजे ही कंपनी नेस कॅफे, सेरेलॅक, मॅगी यासारख्या लोकप्रिय खाद्यपदार्थांची निर्मिती करते.भारतात ६ महिन्यांच्या बाळाला नेस्ले कंपनीचे गव्हापासून बनवलेले सेरेलॅक दिले जाते. सेरेलॅकच्या विविध फ्लेवरच्या १५ उत्पादनांचा अभ्यास केल्यानंतर त्यामध्ये एका सेवनात सरासरी २.७ ग्रॅम साखर असल्याचे आढळून आले आहे. अन्य विकसनशील देशांपैकी फिलिपाईन्समध्ये हे प्रमाण ७.३ ग्रॅम आढळून आले आहे; पण हेच सेरेलॅक ब्रिटेन, जर्मनी या देशांमध्ये कोणतीही अतिरिक्त साखर न मिसळता विकले जाते. याचाच अर्थ विकसनशील देशांतील मुलांना त्याची सवय लावण्याच्या दृष्टीने आणि खर्च कमी करण्याच्या दृष्टीने अशी सरमिसळ करण्यात येते, हे उघड आहे. कंपनीचे हे कृत्य मुलांच्या जीवाशी आणि आरोग्याशी खेळ आहे. शरीरात अतिप्रमाणात साखर गेल्यास मधुमेह, हृदयविकारांपासून अन्यही आजार जडण्याचा धोका असतो.याची 'नेस्ले'सारख्या जगद्विख्यात बहुराष्ट्रीय कंपनीला कल्पना नसेल, असे मानणे वेडगळपणाचे ठरेल. प्रत्यक्षात या सर्वांची माहिती असल्यामुळेच बहुराष्ट्रीय कंपन्या जाणीवपूर्वक लोकांच्या आरोग्याशी खेळ करीत असतात.आरोग्याला हानीकारक असलेल्या पदार्थांच्या नियमित सेवनातून अनेक आजार होतात. विशेषत: वजन वाढून स्थूलपणा येतो आणि एकदा स्थूलपणा आला की, पुढील काळात अनेक व्याधी या सहव्याधी म्हणून जडतात. आज बाजारात मिळणारी बहुराष्ट्रीय कंपन्यांची कोणतीही शीतपेये, डबांबद ज्यूस, एनर्जी ड्रिंक्स, बिस्किटे वापरून पाहिल्यास त्यात साखरेचे, सोड्याचे, मीठाचे प्रमाण अधिक असते. या खाद्यपदार्थांचा समावेश अल्ट्रा प्रोसेस्ड पदार्थात होतो. अलिकडेच ब्रिटिश जर्नलच्या एका खुलाशानुसार अशा खाद्यपदार्थामुळे जीवनमानावरही नकारात्मक परिणाम होतो. आपल्या आहारात अल्ट्रा प्रोसेस्ड फुडचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा अधिक असेल तर शरीरात कर्करोग, मधुमेह, हृदयरोग, नैराश्य यासारखे आजार बळावतात. भारतात अलिकडेच अशा आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांची संख्या वेगाने वाढली आहे. आपल्या देशातील ग्राहकराजा जागरूक झाला तर या गोष्टी थांबविल्या जाऊ शकतील. त्याच बरोबर खाद्यपदार्थात किती प्रमाणात साखर आणि मीठ आहे त्याचा उल्लेख पॅकवर ठळक शब्दांत नमूद करणे गरजेचे आहे.एका अभ्यासानुसार, इंडियन एनर्जी डिंलक्स अणि स्पोर्ट्स ड्रिंक्सचा सध्याचा बाजार हा ४.७ अब्ज डॉलरचा आहे मात्र यामध्ये बहुतांश एनर्जी ड्रिंक्स हे अतिशर्करायुक्त आहेत. असे असूनही एनर्जी ड्रिंक्सची विक्री ही दरवर्षी ५० टक्क्यांनी वाढत आहे. युवकांकडून त्याचे अधिक सेवन केले जात आहे, ही बाब चिंताजनक आहे. कारण यामुळे तरुणांना अकाली वृद्धत्व येण्याचे प्रमाण वाढले असून खुद्द फुड सेफ्टी ॲण्ड स्टॅंडर्ड्स ॲथोरिटी ऑफ इंडिया (एफएसएसएआय) ने ही बाब गंभीर असल्याचे म्हटले आहे. याचे गांभीर्य लक्षात घेता इ-कॉमर्स कंपन्यांनी आपल्या संकेतस्थळावर विकल्या जाणा-या फुड प्रॉडक्टची माहिती योग्य रितीने द्यावी, असे 'एफएसएसएआय'ने सांगितले आहे. आज बोर्नव्हिटाचे प्रकरण समोर आले असले तरी या निमित्ताने बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या बाजारातील सर्वच उत्पादनांवर एकदा क्ष-किरण टाकणे गरजेचे आहे. मागील काळात याच कंपनीच्या मॅगी या उत्पादनामध्ये शिशाचे प्रमाण अधिक आढळले होते.



# चिंता घसरत्या मत टक्क्याची!

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या दोन टप्प्यांत राज्यात गत वेळच्या तुलनेत कमी मतदान झाले. मत टक्क्यातील ही घसरण चिंताजनक आहे. लोकसभा निवडणुकीची घोषणा झाल्यापासून निवडणूक आयोग व त्याच्या अधिन काम करणा-या प्रशासकीय यंत्रणेने मतदानाची टक्केवारी ७५ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी 'मिशन ७५' हाती घेतले होते. या मोहिमेत विविध स्वयंसेवी संस्था, संघटना व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सामावून घेण्यात आले. सर्वसाधारणपणे प्रस्थापित विरोधी किंवा समर्थनार्थ लाट असली की मतदान वाढते, असा आजवरचा अनुभव; परंतु पहिल्या दोन टप्प्यांतील मतदानाची आकडेवारी पाहता आजवरच्या अनुभवाला ठोकर बसली, असे म्हणावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत लोक मोठ्या संख्येने मतदान करतील, असा सत्तारूढ भाजपचा अंदाज होता; परंतु पहिल्या दोन टप्प्यांतील आकडेवारीने तो फोल ठरवला. पहिल्या टप्प्यात १९ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशातील १०२ मतदारसंघांत १६ कोटींहून अधिक मतदार असतानाही ६५.५० टक्केच मतदान झाले. २०१९ मध्ये पहिल्या टप्प्यातच ६९.५० टक्के मतदान झाले होते. या वेळी निवडणूक आयोगाने मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून विविध प्रयत्न केले होते तरी ती वाढण्याऐवजी घटली. निवडणूक आयोगाने समाज माध्यमातून अनोखी अभियाने राबवली होती. 'चुनाव का पर्व, देश का गर्व' या संकल्पनेअंतर्गत लोकांना संदेश पाठवण्यात आले होते. विविध क्षेत्रांतील मान्यवरांची सदिच्छादूत म्हणून निवड करून त्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली होती. भित्तीचित्रे, पत्रके व जाहिरातींच्या माध्यमातून मतदान करणे कसे महत्त्वाचे हे बिंबवण्यात आले.व्हॉटस् ॲप, एक्स, इन्स्टाग्राम, फेसबुक, यूट्युब या माध्यमातून तरुणांमध्ये निवडणुका व मतदान याबद्दल कुतूहल निर्माण केले गेले तरीदेखील मतटक्का वाढला नाही. असे का झाले असावे, या मागे कडक उन्हाळा, लग्नसराई अशी कारणे दिली जात आहेत. आयोगाने अधिकाधिक प्रमाणात लोकांनी मतदान करावे यासाठी या वेळी ८५ पेक्षा जास्त वय असलेल्यांना घरातून मतदान करण्याची सोय उपलब्ध करून दिली होती; परंतु मतदान न करण्याची बळावत चाललेली वृत्ती लोकशाहीसाठी मारक तर आहेच शिवाय नागरिकत्वाचा अवमान करणारीही आहे. आता मतदानाचा टक्का वाढवण्याचे आव्हान निर्माण झाले असून, या राष्ट्रीय कार्यात प्रत्येक मतदाराचा १०० टक्के सहभाग अत्यावश्यक आहे. मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी काय करता येईल यावर आयोग, सरकार, समाजसेवी संस्था आणि सजग नागरिकांच्या सक्रिय सहभागाने विचारमंथन झाले पाहिजे. मतटक्क्यात घसरण होण्यामागे अनेक कारणे आहेत.मतदार यादीतील गोंधळ त्या मागे असू शकतो. २०१९ च्या यादीत नावे असताना २०२४ च्या यादीतून काही मतदारांची नावे गायब झाली. राज्यात गत काही वर्षात पक्ष फोडाफोडीचे जे राजकारण झाले ते अनेक मतदारांना आवडले नाही. आज ज्याला मत दिले तो उद्या दुस-या पक्षात गेला तर काय? असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण झाला त्याचाही परिणाम मतदानावर झाला असावा. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबल्यामुळे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची नाराजीही भोवली असावी. राज्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार प्रशासकाच्या हाती आहे. कार्यकर्ते पदावर असले की उत्साहाने काम करतात. पद नसले की त्यांचा उत्साह कमी होतो. सरकारच्या कारभाराला कंटाळलेले लोक मतदानासाठी बाहेर पडत नसल्याचे बोलले जात आहे. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात कमी मतदान झाले. मोठ्या संख्येने असणारा मध्यमवर्ग मतदान केंद्राकडे फिरकलाच नाही. मतदानाची सरकारी सुटी,मतदान सुरळीत पार पाडावे म्हणून कोट्यवधी रुपयांचा खर्च, प्रत्येकाला मतदानाचा हक्क व कर्तव्य बजावता यावे यासाठी खासगी अस्थापना बंद ठेवण्याचे आदेश, मतदानाचा उत्सव साजरा करण्यासाठी शासनाने इतकी सारी तयारी करूनही सुशिक्षित शहरी मतदाराने मतदानाला हरताळ फासण्याचे काम केले. प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आहे; परंतु मतदार मतदान केंद्रापर्यंत पोहोचण्याची तसदीही घेणार नसेल तर या लोकशाहीला काय अर्थ? मुंबईसारख्या मोठ्या शहरात उच्चशिक्षित आणि सधन वर्ग मोठ्या प्रमाणात असलेल्या मतदारसंघात मतदानाची टक्केवारी कमी होताना दिसते मात्र, झोपडपट्टी आणि कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात असलेल्या भागात ६०-६५ टक्क्यांहून अधिक मतदान होते याला काय म्हणावे? आज स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटली तरी अनेक भागात एकूण मतदारांपैकी निम्मेही मतदान केंद्रापर्यंत पोहोचत नाहीत, अशी स्थिती आहे. कोणत्याही निवडणुकीत उमेदवाराचा विजय अथवा पराभव हा मतांच्या आधारे ठरवला जातो म्हणजेच प्रत्येक मताला स्वत:चे मोल आहे. मतदानाची टक्केवारी जास्त राहिल्यास निकालाचा आकृतिबंध वेगळा दिसू शकतो. राजकारण हे व्यापक परिवर्तनाचे साधन आहे. पक्षकारण हे राजकारणापेक्षा श्रेष्ठ झाले म्हणून लोकहिताचे राजकारण मागे पडले त्यामुळे निराशा न होता, देशात मूलगामी बदल घडवण्याचा मार्ग म्हणून राजकारणाकडे पाहिले पाहिजे. लोकशाहीत संसदीय राजकारणाला महत्त्व असते आणि त्या अंतर्गत निवडणुका होत असतात. आजकाल राजकारणाचा चिखल झाला, सारेच राजकारणी संधिसाधू झाले, हमाम मे सब नंगे, अशा प्रकारची मते व्यक्त करून केवळ बोटे मोडण्यात अर्थ नसतो. शेवटी आहे त्या पर्यायांमधून योग्य पक्षाची व व्यक्तीची निवड करणे, त्यासाठी राजकारणाकडे डोळसपणे पाहणे आपल्या हाती असते. 'मला काय त्याचे, माझ्या एका मताने काय होणार आहे' असे न म्हणता देश व मतदारसंघासमोरील आव्हाने व प्रश्न कोणते याचे भान ठेवून आपण आपले कर्तव्य पार पाडायला हवे, असे झाल्यास मत टक्क्यात निश्चितपणे सुधारणा होईल. एका मतानेसुद्धा 'रावाचा रंक' होऊ शकतो.



# लोकशाही नव्हे तर देशमुखशाही बचाव करिता धडपड सुरू आहे - ऋषिकेशदादा कराड

लातूर दि. २९- लोकसभेची निवडणूक ही देशाच्या प्रश्नासाठी महत्त्वाची असून काँग्रेसकडे कुठलाच मुद्दा नाही. देशात पुन्हा नरेंद्रजी मोदी यांचे सरकार येणार हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. संविधान बचाव, लोकशाही बचाव असे काँग्रेसकडून ओरड केली जात आहे. खऱ्या अर्थानं या निवडणुकीच्या माध्यमातून लातूरात देशमुखशाही बचावसाठी धडपड सुरू असल्याचे प्रतिपादन भाजपाचे युवा नेते ऋषिकेश दादा कराड यांनी केले.

लातूर लोकसभा निवडणुकीतील भाजपा महायुतीच्या प्रचारार्थ लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भादा येथे शनिवारी रात्री मोठी जाहीर सभा झाली. या सभेस महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, युवा नेते ऋषिकेशदादा कराड, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, मनसेचे शिवकुमार नागराळे, शिवसेनेचे गोविंद माडजे, रेवनसिद्धाप्पा पाटील, पद्माकर चिंचोलकर, बालाजी शिंदे, गुणवंत कारंडे, सतीश कात्रे, योगेश लटुरे, देवराव मोहिते, बब्रुवान बंडगर, संजय शिंदे, राजकीरण साठे, रवींद्र पाटील, श्रीनाथ बंडगर, गिरीश पवार, महादेव गुरुशेट्टे, फुलचंद अंधारे, वाजीद पठाण, उद्धव काळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. या जाहीर सभेस भादा सर्कल मधील भाजपा व मित्र पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासह मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






देशाचा सर्वांगीण विकास कोण करू शकतो आणि देशाचे सक्षम नेतृत्व कोण करू शकतो यासह देशहितासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगून या सभेत बोलताना युवा नेते ऋषिकेश कराड म्हणाले की, या निवडणुकीत निती, नियत आणि नेता हे तीन मुद्दे अत्यंत महत्त्वाचे असून काँग्रेसची भ्रष्टाचाराची नीती परिवारवादाची नियत आणि उद्या नेता कोण होणार हे कोणालाच माहित नाही. मात्र भाजपाची स्पष्ट नीती असून दहा वर्षात एकही आरोप विरोधकांना करता आला नाही अशी स्पष्ट नियत आहे तर देशाला दिशा देणारा आणि जगाचे नेतृत्व करू शकणारा नरेंद्रजी मोदी यांच्या रूपाने सक्षम नेता भाजपा महायुतीकडे असल्याचे बोलून दाखविले.

आपल्या कुटुंबातच भाऊ, मुलगा, नातलग यांच्याकडेच कारखाना, बँका व इतर संस्थांची पदे देणाऱ्या देशमुखांच्या तोंडून लोकशाहीची भाषा शोभा देत नाही. काँग्रेसच्या काळात शासनाच्या विविध योजनेचा लाभ तोंड बघून नाहीतर बगलबच्चे यांनाच दिला गेला असा आरोप करून भाजपाने गोरगरीब सर्वसामान्य साठी अनेक योजना सुरू केल्या त्याचा लाभ जात, धर्म, पक्ष, गट, तट असा कोणताही भेदभाव न करता गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना दिला देशभरातील सर्व जनता केंद्र शासनाच्या कोणत्या योजनेचे लाभार्थी आहेत असेही ऋषिकेश कराड यांनी सांगितले.

देशात पुन्हा मोदीजींचे सरकार येणार हे सूर्यप्रकाशाइतके सत्य असून लातूर मतदारसंघातून सत्तेतील खासदार निवडून गेला पाहिजे यासाठी महायुतीचे उमेदवार सुधाकर शृंगारे यांनाच प्रचंड बहु मताधिक्याने विजयी करावे आणि देशाच्या सर्वांगीण विकासाबरोबरच मतदार संघाच्या विकासाला गती द्यावी असे आवाहन ऋषिकेश दादा कराड यांनी केले.

महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यावेळी बोलताना म्हणाले की, गेल्या पाच वर्षात लातूर मतदारसंघात हायवे रस्त्याचे जाळे निर्माण झाले, गावागावात जल योजनेअंतर्गत शुद्ध पाणीपुरवठा योजना मंजूर केल्या, गरजूंना मोठ्या प्रमाणात घरे मंजूर केली असे सांगून जगात देशाची शान आणि मान उंचावणारे आणि जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता असणारे नरेंद्रजी मोदी यांना समर्थन देण्यासाठी आपण सर्वांनी भाजपा महायुतीला बहुमताने विजयी करून पुन्हा एकदा मला काम करण्याची संधी द्यावी असे आवाहन त्यांनी केले.

या सभेत इतर अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून ७ मे रोजी महायुतीचे उमेदवार सुधाकर शृंगारे यांच्यासमोरील कमळाचे बटन दाबून मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले. सभेचे सूत्रसंचालन राजकिरण साठे यांनी केले.

## लोहा मतदार संघात खा. श्रृंगारे यांच्या निधीतून कोट्यवधी रुपयांची विकास कामे : प्रविण पाटील चिखलीकर

लोहा/प्रतिनिधी : भाजपा सरकारच्या दहा वर्षाच्या कार्यकाळात राबविण्यात आलेल्या विविध योजना सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या आहेत. लोहा-कंधार मतदारसंघासाठी खा. सुधाकर शृंगारे यांच्याकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मिळाला. या निधीतून विविध विकासकामे राबविण्यात आली. खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी या परिसराच्या विकासासाठी खा. शृंगारे यांना नेहमीच सहकार्य केले, असे प्रतिपादन भाजपा युवा नेते प्रविण पाटील चिखलीकर यांनी केले. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ लोहा येथे आयोजित बैठकीत प्रविण पाटील बोलत होते. ते म्हणाले की, लोहा विधानसभा मतदारसंघात सिंचनाचे विविध प्रकल्प, उद्योग, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वेमुळे दळण-वळणामध्ये वाढ झाली. मतदार संघातील ग्रामीण भागात केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या कामाची पावती त्यांना या निवडणुकीत मिळणार आहे. खा. श्रृंगारे यांना नक्कीच अजून एकदा सेवा करण्याची संधी मिळणार असल्याचे ते म्हणाले. खा. श्रृंगारे यांनी विविध विकासकामे केली. रूग्णांना आरोग्य सेवेसाठी तात्काळ रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या. कोरोना काळातील त्यांचे कार्य वाखाणण्याजोगे आहे. गत निवडणुकीत खा. शृंगारे यांना लोहा कंधारमधून मताधिक्य दिले होते. त्याहीपेक्षा जास्तीचे मताधिक्य देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करायचे आहेत.



मोदी सरकारने गत दहा वर्षात देशातील गरीब, मजूर, स्त्री, यांच्या हिताचे काम केले. किसान सन्मान निधीमुळे लाखो शेतकर्यांचा फायदा झाला आहे. जलजीवन मिशन योजनेतून घराघरात पाणी पोहोचले. कलम ३७०, राममंदिर, आयुष्यमान भारत योजना, गोरगरीब जनतेला पक्की घरे आदी योजना त्यांनी राबविल्या. मोदी सरकारने सर्वसामान्य नागरिकांची बँक खाती उघडली. डिजिटल इंडियासारखी असंख्य कामे भाजपा नेतृत्वाने केली. गेल्या सत्तर वर्षातील काँग्रेसच्या कार्यकाळातील बॅकलॉक भाजपाने भरून काढला. या निवडणुकीत ४००चा आकडा पार करून देशाला महासत्तेकडे नेण्यासाठी जनतेने कोणत्याही भुलथापांना बळी न पडता मतदारांनी खा. सुधाकर शृंगारे यांना प्रचंड मताने निवडून देत नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्याचे आवाहन प्रविण पाटील चिखलीकर यांनी केले आहे.

## प्रजासत्ताक दिनाच्या पथसंचलनात गडचिरोली आणि गोंदिया राज्यात अव्वल

गडचिरोली : देशात दरवर्षी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विविध ठिकाणी विविध सुरक्षा दलांच्या जवानांच्या पथसंचलनाचे आयोजन केले जाते. महाराष्ट्रात देखील पोलिस दलातील विविध घटकांतील पथके आपल्या शिस्तीचे, एकजुटीचे प्रदर्शन पथसंचलनाच्या माध्यमातून दाखवितात. अशातच गेल्या २६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत, मुंबई येथे झालेल्या पथसंचलनात भाग घेतलेल्या पथकांमधील उत्कृष्ट पथसंचलन केलेल्या पथकांना शासनातर्फे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे.त्याकरिता गठित करण्यात आलेल्या निवड समितीने उत्कृष्ट पथसंचलनासाठी प्रथम क्रमांकासाठी गडचिरोली आणि गोंदिया पोलिसांच्या सी-६० पथकाची निवड केली आहे. तर द्वितीय क्रमांक राज्य राखीव पोलिस बल आणि तृतीय क्रमांक बृहन्मुंबई पोलिस दंगल नियंत्रण पथक, अशा तीन पथकांची यात निवड करण्यात आली आहे. गडचिरोली पोलिस दल आणि गोंदिया पोलिस दलाच्या सी ६० पथकाने संयुक्तरित्या सर्वोत्कृष्ट पथसंचलन करुन २६ जानेवारी २०२४ रोजी शिवाजी पार्क दादर, मुंबई येथे झालेल्या प्रजासत्ताक दिनाच्या पथसंचलनामध्ये प्रथम क्रमांक पटकविला. या कार्यक्रमाला प्रमुख्याने महामहिम राज्यपाल यांची उपस्थिती लाभली होती. त्यावेळी राज्यभरातून आलेल्या विविध पथसंचलनापैकी गडचिरोली पोलीस दल आणि गोंदिया पोलिस दलाच्या सी - ६० पथकाची निवड करण्यात आल्याने, गडचिरोली-गोंदिया पोलिसांमध्ये आणखी एक मानाचा तुरा रोवला गेलाय. या उत्कृष्ट कामगिरी बद्दल गडचिरोली, गोंदिया पोलिस दलाचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.प्रजासत्ताक दिनी पथसंचलनामध्ये सर्वोत्कृष्ट पथसंचलन करणा-या पथकांना आज दिनांक २९ एप्रिल रोजी राज्याचे अप्पर पोलिस महासंचालकांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले आहे. गडचिरोली पोलिस दलाचे सी - ६० पथके माओवादविरोधी कारवायांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावत असतात, त्यासोबतच पथसंचलनामध्ये देखील त्यांनी आपल्या शिस्तीचे आणि एकजुटीचे प्रदर्शन दाखवून दिले आहे. त्यामुळे त्यांची ही कामगिरी सा-यांच्या कौतुक आणि अभिनंदनाचा विषय ठरली आहे.



## तुम्हीही झोपेतून उठल्यावर डोळ्यांवर पाणी मारताय? ही सवय ठरू शकते हानिकारक! डॉक्टरांनी दिलाय सल्ला

सकाळी झोपेतून उठल्यानंतर लगेच तोंडावर, डोळ्यांवर पाणी मारण्याची अनेकांना सवय असते. असे उठल्या उठल्या सपासप डोळ्यांवर पाणी मारण्याने अत्यंत थंडगार आणि ताजेतवाने वाटते नाही का? मात्र, तुम्हाला हे सवयीचे असल्यास ती एक 'वाईट सवय' असल्याचे लेसिक व मोतीबिंदूचे सर्जन, डॉक्टर राहुल चौधरी यांचे मत आहे. अशी माहिती दी इंडियन एक्स्प्रेसच्या एका लेखावरून मिळाली आहे. आपल्या डोळ्यांमध्ये अश्रूंच्या ग्रंथी असतात. त्यांवर तेलाचा एक थर असतो. जेव्हा आपण डोळ्यांवर पाणी मारतो, तेव्हा त्याचा परिणाम त्या थरावर होत असतो. परिणामी तुमच्या डोळ्यांना कोरडेपणा येतो. डोळ्यांमधील अनावश्यक गोष्टी / कचरा बाहेर काढण्यासाठी डोळ्यांमध्ये नैसर्गिक यंत्रणा असते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे, अशी माहिती डॉक्टर राहुल चौधरी यांनी यूट्युब पॉडकास्टर रणवीर अलाहाबादिया यांच्याशी झालेल्या संभाषणात सांगितली.पंचशील पार्कच्या मॅक्स मल्टी स्पेशालिटी सेंटरमधील नेत्ररोगशास्त्रज्ञ व प्रमुख सल्लागार डॉक्टर दीपाली गर्ग माथूर यांनीही डॉक्टर राहुल यांच्या मताशी सहमती दर्शविली आहे. तसेच, आपले डोळे हे नैसर्गिकरीत्या अश्रूंनी स्वच्छ होतात, असे त्या म्हणतात. डोळ्यांमध्ये गेलेला कोणताही कचरा बाहेर काढण्यासाठी, तसेच डोळ्यांना वंगण म्हणून अश्रू काम करतात. इतकेच नव्हे, तर कोणत्याही संसर्गांपासूनही आपल्या डोळ्यांचा बचाव केला जातो, असे डॉक्टर माथूर म्हणतात अश्रूंमध्ये लाइसोझाइम, लैक्टोफेरिन, लिपोकॅलिन, लैक्टोफेरिन, इम्युनोग्लोबुलिन, ग्लुकोज, युरिया, सोडियम व पोटॅशियम या घटकांसह पाण्याचा थर, म्युसिन थर व लिपिड्स असे तीन थर नैसर्गिकरीत्या असतात. आपल्या अश्रूंमध्ये अनेक असे घटक असतात; जे आपल्या डोळ्यांचे इतर जीवजंतूंपासून रक्षण करण्यास मदत करतात, असे डॉक्टर माथूर म्हणतात.त्यामुळे झोपून उठल्यावर डोळ्यांवर पाणी मारून आरामदायी आणि ताजेतवाने जरी वाटत असेल तरीही असे करणे चुकीचे आणि डोळ्यांसाठी त्रासदायक ठरू शकते. आपल्या डोळ्यांची नाजूक रचना, कॉर्निया व नेत्रश्लेष्मला यांना आपण ज्या घटकांच्या संपर्कात आणतो, त्यांसाठी आपले डोळे संवेदनशील असतात, अशी माहिती कुकटपल्ली येथील मॅक्सिव्हिजन आय हॉस्पिटल्सच्या वरिष्ठ कॉर्निया व रिफ्रॅक्टिव्ह सर्जन डॉक्टर माधवी मॅजेटी यांनी दिली.डॉक्टर माधवी यांच्या मते, आपण जे पाणी वापरतो ते पाणी अशुद्ध असून, त्यामध्ये अनेक जीव-जीवाणू असू शकतात; ज्यांमुळे आपल्या डोळ्यांना धोका होऊ शकतो. नळाच्या पाण्याचा तुम्ही थेट डोळ्यांवर वापर केल्यास अशुद्ध पाण्यामुळे डोळ्यांना जळजळ, संसर्ग किंवा इतर त्रासदायक संभाव्य धोके निर्माण होऊ शकतात. इतकेच नव्हे, तर ज्या टीयर फिल्म ींशरी षळश्रा मुळे डोळ्यांच्या पृष्ठभागाची काळजी आणि दृष्टीची स्पष्टता राखण्यास मदत मिळते, त्या टीयर फिल्ममध्ये डोळ्यांवर मारल्या जाणाऱ्या पाण्याच्या हबक्याच्या तीव्रतेमुळे व्यत्यय येऊ शकतो, असेही डॉक्टर माधवी म्हणतात.यावर उपाय काय?डोळ्यांवर भराभर आणि जोरात पाणी मारण्यापेक्षा सौम्य पद्धतीचा वापर करावा, असे डॉक्टर माधवी सांगतात. थेट डोळ्यांवर पाणी मारण्याऐवजी एखाद्या ओल्या स्वच्छ फडक्याने डोळ्यांभोवतीचा भाग पुसून घ्या. तसेच रात्रभर झोपल्याने डोळ्यांतून पाणी आले असल्यास किंवा इतर स्राव स्वच्छ करून घ्यावा.

## मोदी सरकारची विकासगंगा गावागावात पोहचवली : खा. शृंगारे

भादा/प्रतिनिधी : लातूर लोकसभा मतदारसंघाचा प्रतिनिधी म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने राबविलेली विकास गंगा मतदारसंघातील प्रत्येक गावांत पोहचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न मागील पाच वर्षात आपण केला आहे. केवळ प्रसिध्दीच्या झोतात न राहता विकास कामावरच लक्ष केंद्रीत केले असून याच बळावर मी आपल्याकडे पुन्हा एकदा मत मागण्यासाठी आलो आहे, असे प्रतिपादन खा. सुधाकर शृंगारे यांनी केले. भादा येथे आयोजित प्रचार सभेत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे हे बोलत होते. या सभेस युवा नेते ऋषिकेश कराड, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, मनसेचे शिवकुमार नागराळे, शिवसेनेचे गोविंद माडजे, रेणवसिध्दाप्पा पाटील, पद्माकर चिंचोलकर, बालाजी शिंदे, गुणवंत कारंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. खा. शृंगारे म्हणाले की, मागील पाच वर्षाच्या काळात लातूर मतदारसंघात महामार्गांचे जाळे तयार झाले आहे. पिण्यासाठी शुध्द पाणी मिळावे म्हणून पेयजल योजना मंजूर करण्यात आली आहे. गरजवंतांना पंतप्रधान आवास योजनेतून घरे देण्यात आली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारकडून लातूर मतदारसंघाला आवश्यक असणार्या सर्व विकास योजनांची अमलबजावणी आपण केली आहे. ही कामे करताना मी कधीही स्वतःची प्रसिध्दी केली नाही. केवळ कामच करत राहिलो. मी केलेली कामे जनतेसमोर आहेत. त्यावरच जनतेने या निवडणुकीच्या माध्यमातून मला पुन्हा एकदा सेवा करण्याची संधी द्यावी, असे आवाहनही खा. शृंगारे यांनी यावेळी बोलताना केले.




मनोगत व्यक्त करताना ऋषिकेश कराड म्हणाले की, ही निवडणुक देशासाठी महत्वाची आहे. विरोधकांकडे कुठलाही मुद्दा नाही तर भाजपा विकासावर बोलत आहे. देशात पुन्हा एकदा मोदींच्या नेतृत्वातील सरकारच येणार हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. मोदींच्या सरकारमध्ये काम करणारा प्रतिनिधी आपल्याला निवडून द्यायचा आहे. देशासोबतच लातूर मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करून घेण्यासाठी शृंगारे यांना पुन्हा एकदा संसदेत पाठवा, असे आवाहनही त्यांनी केले. या सभेचे सूत्रसंचलन राजकिरण साठे यांनी केले. यावेळी सतीश कात्रे, योगेश लटुरे, देवराव मोहीते, बब्रुवान बंडगर, संजय शिंदे, श्रीनाथ बंडगर, गिरीष पवार, महादेव गुरुशेट्टी, फुलचंद अंधारे, वाजीद पठाण, उध्दव काळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## डॉ.मेघराज चावडा यांना मातृशोक



लातूर :- विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय लातूर येथील सर्जन विभाग प्रमुख डॉ. मेघराज जयंतीलाल चावडा यांच्या मातोश्री सौ नर्मदा बेन जयंतीलाल चावडा यांचे न्यू भाग्यनगर लातूर येथील राहत्या घरी सोमवार २९ एप्रिल रोजी दुपारी १-०० वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७८ होते. त्यांच्या पश्चात पती जयंतीलाल चावडा, एक मुलगा डॉ मेघराज चावडा, चार मुली, सून,नात असा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी खाडगाव शमशानभूमी येथे मंगळवारी ३० एप्रिल रोजी ११:०० वाजता होणार आहे. त्यांच्या या दुःखद निधनामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रूग्णालय येथील डॉक्टर, कर्मचारी, मित्र,स्नेही हळहळ व्यक्त करीत आहेत. चावडा परिवारावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे या दुःखातून त्यांना सावरण्याची ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे. दैनिक महावृत्त परिवार त्यांच्या या दुःखात सहभागी आहे.

## रोज एक चमचा एरंडेल तेलाच्या सेवनाने तुमच्या शरीरावर काय परिणाम होईल? डॉक्टरांकडून जाणून घ्या

कॅस्टर ऑईल म्हणजेच एरंडेल तेलाचे अनेक फायदे आहेत. आपल्या शरीरातील विविध अवयवांवर हे तेल काम करते. आपल्या घरातील थोरामोठ्यांनी नेहमीच आपल्याला एरंडेल तेलाच्या फायद्यांबद्दल सांगितले आहे. एरंडेल वनस्पतीच्या बियांपासून हे तेल काढले जाते. या तेलाचे अनेक औषधी, औद्योगिक उपयोग आहेत. एरंडेल तेलाचे दाहकविरोधी आणि जीवाणूविरोधी फायदे आहेत. पण, त्याचा वापर औद्योगिक रसायने, औषधे आणि त्वचेची काळजी घेणाऱ्या उत्पादने यांमध्येही केला जातो. जर तुम्ही दररोज एक चमचा एरंडेल तेलाचे सेवन केले, तर तुमच्या शरीरावर त्याचा काय परिणाम होतो? याच विषयावर हैदराबाद येथील यशोदा हॉस्पिटल्सचे सल्लागार फिजिशियन व मधुमेह तज्ज्ञ डॉ. के. सोमनाथ गुप्ता यांनी माहिती दिल्याचे वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊ.डॉक्टर म्हणतात, एरंडेल तेलात असे अनेक गुणधर्म असतात की, जे आपल्या शरीरासाठी लाभदायी आहेत. त्यासाठी एरंडाची पानेही खूप उपयुक्त आहेत. एरंडेल तेलामध्ये रेचक घटक असतात; जे जखमेवरील उपचार आणि ऊतींच्या वाढीच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी उपयुक्त असल्याचे मानले जाते. त्यामुळे जखमा लवकर भरून येण्यास मदत होते. जर एखाद्या ठिकाणी लालसरपणा असेल, तर एरंडेल तेलाने तोदेखील कमी होईल.बद्धकोष्ठतेची समस्या असल्यास तुम्ही नियमित एक चमचा एरंडेल तेलाचे सेवन करावे. एरंडाचे तेल हे पोट फुगणे, पोटदुखी, अपचन, वायू धरणे (गॅस), बद्धकोष्ठता या सर्व समस्यांवर गुणकारी ठरते. एरंडाच्या तेलामधील गुणधर्म पचनक्रिया सुधारून, बद्धकोष्ठतेवर अचूक व रामबाण इलाज करतात. एरंडेल तेलामध्ये जीवनसत्त्व ई, प्रथिने, खनिजे आणि ओमेगा-६ व ओमेगा-९ हे फॅटी ॲसिड घटकही आढळतात; जे मलत्यागासाठी उपयुक्त ठरतात. त्याचप्रमाणे केसगळती थांबविण्यासह केसांच्या वाढीसाठीही एरंडेल तेलाचा वापर केला जातो.एरंडेल तेलाच्या सेवनकर्त्यांनी घ्यावयाची खबरदारी १. या तेलाच्या दीर्घकालीन वापरामुळे आतड्यांचे नुकसान होऊ शकते. एरंडेल तेलाची ॲलर्जी असणाऱ्या काही व्यक्तींना त्वचेची जळजळ होण्याचा त्रास होऊ शकतो.२. गर्भवती महिलांनी एरंडेल तेलाचा अंतर्गत वापर काटेकोरपणे टाळावा. कारण- त्यामुळे गर्भाशयाच्या आकुंचनाला उत्तेजन मिळून गर्भपाताचा धोका वाढू शकतो.

# शहरासह गोंडवाडसा, वाईबाजार, वानोळा परिसरात नुकसान

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) : किनवट माहूर तालुक्याचे निसर्गचक्र बिघडल्याने गेल्या दोन महिन्यापासून अवकाळी पाऊस गारपीट वादळी वाऱ्याने थैमान घातले असून दिनांक २७ रोजी रात्री दहा ते पंधरा मिनिट वादळी वारे आणि पावसाने धुमाकूळ घातल्याने गोंडवडसा वाई बाजार किनवट माहूर आणि वानोळा सर्कल मधील अनेक गावात घरा गोठ्यासह शेतमालाचे प्रचंड नुकसान झाले आहे. गेल्या दोन महिन्यापासून किनवट माहूर तालुक्याचे निसर्गचक्र बिघडल्याने अचानकपणे आभाळ दाटून येणे पाऊस पडणे जोराचे वादळी वारे तर अचानकपणे सूर्य आग ओखत असल्याने शेतकऱ्यासह नागरिकांचे प्रचंड नुकसान होत आहे काल रात्री झालेल्या वादळी वारे आणि पावसामुळे अनेक झाडे तुटली असून शेतात काढून ठेवलेले तुरीचे पीक पाणी पडल्याने भिजून गेले असून खेड्यापाड्यात





शेतातून कापणी करून आणलेले तुर व इतर पिके वाळविण्यासाठी ठेवल्याने त्यांचे वरही पाणी पडल्याने नुकसान झाले असून वादळी वाऱ्यामुळे अनेक घरांची पडझड झाली तर टीन पत्रे उडून गोंडवडसा येथील एका कार मध्ये गेल्याने कारचे प्रचंड नुकसान झाले आहेत. तालुक्यातील अनेक गावात वादळी वारे व पावसाने पत्रे उडाली तर शेतातील लावलेले सौर ऊर्जा प्लांट चे प्लेटा तुटून उडाल्याने प्रचंड नुकसान झाले असून रात्री पाऊस दिवसा कडक ऊन त्यामुळे नागरिकांना प्रचंड उकाडा जाणवत असल्याने अनेक नागरिकांना उन्हाचा तडाका बसल्याने उलट्या संडास लागत असल्याने रुग्णालयात – अशा रुग्णांची गर्दी होत आहे तालुक्यात अनेक वेळा गारपीट अवकाळी पाऊस वादळी वाऱ्यामुळे शेतकरी व नागरिकांचे – नुकसान झाल्याने शासनाकडून तात्काळ – सर्वे क्षण करून आर्थिक मदतीची मागणी – नुकसानग्रस्त शेतकरी नागरिकातून होत – आहे

# तलावाचे पाणी मुरतंय कुठे ? एक टक्काही सिंचन होईना २१ सिंचन प्रकल्प : शेतीच भिजत नसल्याने कृषी विकासाला ब्रेक

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) : शेती ओलिताखाली यावी आणि कृषी विकास साधावा यासाठी किनवट या डोंगराळ तालुक्यात तीन मध्यम व अठरा लघु, बृहत, साठवण असे २१ प्रकल्प (तलाव) आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून ९ हजार ७७७ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्षात केवळ १ हजार ७७७ हेक्टर शेतीचे सिंचन होत आहे. त्यामुळे प्रकल्पाचे पाणी मुरतंय कुठे? असा प्रश्न निर्माण होत असून, शेती विकासाला ब्रेक लावणाऱ्या या गंभीर प्रश्नी जाब विचारण्याची गरज निर्माण झाली आहे. किनवट तालुक्यात जे प्रकल्प कार्यान्वित आहेत, त्यातील बहुतांश प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांपर्यंत पाणीच पोहोचत नाही. त्यामुळे प्रकल्पीय क्षेत्र केवळ नावालाच आहे. दरवर्षी कालवे दुरुस्तीचे काम हाती घेतले जाते. पण, शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी का पोहोचत नाही, याकडे पाटबंधारे विभाग लक्ष देत नाही. प्रकल्प उभारूनही प्रकल्प निर्मितीचा हेतू किनवट तालुक्यात साध्य होत नसल्याने कृषी विकासाला ब्रेक बसला आहे. प्रकल्पांत साचला गाळ १किनवट तालुक्यात नागझरी, लोणी, ९ डोंगरगाव हे तौन मध्यम प्रकल्प आहेत. तसेच अन्य अठरा असे २१ प्रकल्प आहेत. यातील बरेच प्रकल्प हे ४० वर्षापेक्षा अधिक जुने आहेत. काही



प्रकल्पात गाळाचे प्रमाण जास्त आहे.२परिणामी पावसाळ्यात एक–दोन मोठ्या पावसाने हे प्रकल्प भरतात आणि जसा उन्हाळा सुरू होतो तशी पाणीपातळीत घट होते. त्यामुळे निर्धारित प्रकल्पीय क्षेत्र सिंचनाखाली येत नसावे? प्रकल्पीय क्षेत्र व प्रत्यक्षात ओलिताखाली येणारे क्षेत्र पाहता मोठी तफावत दिसून येत आहे.३उन्हाळी हंगामात चार अंकी व त्यापेक्षा ३ कमी क्षेत्रात पेरणी झाली असण्याची शक्यता आहे. नंदगाव, कुपटी व थोरा या प्रकल्पाच्या हद्दीत एक एकरही क्षेत्र ओलिताखाली नसल्याचे दिसून येत आहे.प्रकल्पाचे नाव, प्रकल्पीय क्षेत्र व कंसात पेरणी झालेले क्षेत्र हेक्टरमध्ये नागद्वारी ९६३ (४०४), लोणी १३७६ (४५३), डोंगरगाव ८३० (४३७), पिंपळगाव (कि) ४०५ (५४), मांडवी ६६८ (१५५), पिंपळगाव (भि) ४८५ (३६), वरसांगवी ४८६ (१३०), शिरपूर ४२७ (२५२), अंबाडी १७२ (०७), निचपूर ४६६ (१६२), सिंदगी (मो) २५० (२६), मुळझरा ६६३ (८४), हुडी ३४८ (२८), सावरगाव १७८ (६७), जलधरा ३६६ (७०), साठवण तलाव सिंदगी (बो) ३२४ (३०), लक्कडकोट २६३ (०५), निराळा ३२० (३४). एकूण प्रकल्पीय क्षेत्र ९७७७ हेक्टर ओलिताखालील क्षेत्र १७७४ हेक्टर ज्या प्रकल्पाचे जेवढे प्रकल्पीय सिंचन क्षेत्र आहे, तेवढे सिंचनाखाली यावे, यासाठी पाटबंधारे विभागाने लक्ष देऊन कृषी विकास साधावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

# नमो युवाशक्ती दुचाकी रॅलीने लातूर भाजपमय आज लातुरात पंतप्रधान मोदी यांची सभा सभेपूर्वीच अभूतपूर्व उत्साह



लातूर प्रतिनिधी : लातूर लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ देशाचे सर्वोच्च नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा मंगळवारी लातूर येथे होणार आहे. सभेच्या पूर्व तयारीसाठी सोमवारी लोकसभा संयोजक आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वात शहरातून नमो युवा शक्ती दुचाकी रॅली काढण्यात आली. या रॅलीस अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. मोदींच्या सभेपूर्वीच संपूर्ण लातूर शहर भाजपमय झाल्याचे दिसून आले. सभास्थळालगत असणार्या बिर्ले फार्म येथून या दुचाकी रॅलीस प्रारंभ झाला. गरुड चौकापासून स्वामी विवेकानंद चौक, गुळमार्केट, मार्केटयार्ड, महात्मा बसवेश्वर चौक, राजीव गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बार्शी रोड, दयानंद गेटमार्गे, पीव्हीआर चौक, एमआयडीसी परिसर, दीपज्योतीनगरमार्गे जुना रेणापूर नाका, अहिल्यादेवी होळकर चौकातून परत फिरत ही रॅली जुना रेणापूर नाका, गावाभागात रामलिंगेश्वर मंदीर, पटेल चौक, खडक हनुमान, सुभाष चौक, गोलाई, बसस्थानक, गांधी चौक या मार्गे आली. त्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे या रॅलीचा समारोप करण्यात आला.

हातात महायुतीचे ध्वज घेतलेले हजारो कार्यकर्ते दुचाकीवरून या रॅलीत सहभागी झाले होते. घोषणा देणार्या युवकांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. या रॅलीत आ. निलंगेकर यांच्यासह लोकसभा प्रभारी किरण पाटील, माजी खासदार सुनिल गायकवाड, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, विधानसभा प्रमुख गुरुनाथ मगे, ॲड. शैलेश गोजमगुंडे, शंकर शृंगारे, अजित पाटील कव्हेकर, दिग्विजय काथवटे, सुनिल मलवाड, भाजयुमोचे शहर जिल्हाध्यक्ष गणेश गोमसाळे, अनंत गायकवाड, शोभाताई पाटील, संतोष पांचाळ, राहुल जाधव, आदीसह भाजपा महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मंगळवारी होणार्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेपूर्वी निघालेल्या या रॅलीमुळे संपूर्ण लातूर शहर भाजपमय झाले आहे. पंतप्रधान मोदी यांना ऐकण्याची उत्सुकता लातूरकरांना असून या रॅलीमुळे ती अधिकच वाढल्याचेही दिसून आले.

# शांतीगिरी महाराजांनी शिवसेनेच्या नावाने उमेदवारी अर्ज भरला

नाशिक : जय बाबाजी भक्त परिवाराचे प्रमुख शांतीगिरी महाराज यांनी आज शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना शांतीगिरी महाराजांनी आपल्या अर्जात शिवसेना पक्ष असा उल्लेख केल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. त्यामुळे महायुतीकडून महाराजांनाच उमेदवारी मिळणार का, याबाबतच्या चर्चांना उधाण आले आहे. या चर्चेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे नेते आणि नाशिकमधून लोकसभा निवडणूक लढण्यास इच्छुक असलेले मंत्री छगन भुजबळ यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे.शांतीगिरी महाराजांच्या उमेदवारीवर बोलताना छगन भुजबळ म्हणाले की नाशिकच्या उमेदवारीबद्दल माझ्याकडे कोणतीही माहिती नाही. मी तर नाशिकमध्येच आहे. त्यामुळे मुंबईत काय ठरले, याबाबतची माहिती माझ्याकडे नाही. त्यांच्या शिष्टमंडळाने माझी भेट घेतली होती. मात्र ज्यांना निवडणुका लढवायच्या असतात, ते सर्वांनाच भेटत असतात. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे तिघे बसून नाशिकमधील महायुतीचा उमेदवार ठरवतील.

# डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर विचार करायला शिकले पाहिजे – उत्तम तरकसे

धारूर :– बीड किल्ले धारूर येथील आसरडोह या गावी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती च्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती साजरी करण्यात आले कार्यक्रमाची सुरुवात निळया ध्वजाचे ध्वज रोहन करून सुरुवात करण्यात आली

सदर कार्यक्रमास राज्य शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी–साहित्यिक व विचारवंत उत्तम दासु तरकसे या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून हजर होते जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्याने त्यांचे निळ्या शालीने त्यांचा सत्कार व सन्मान केला कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आपले विचार व्यक्त करताना म्हणाले की बाबासाहेबांनी आपल्याला शिका संघटित व्हा व संघर्ष करा असा मंत्र दिल्याप्रमाणे आपण वाचायला बोलायला व लिहायला शिकलो पण संघटित झालो नाही व संघर्ष करू लागलो पण तो आपल्या



आपल्यामध्येच त्याकरिता माझे म्हणणे अशी आहे की आपण बाबासाहेबांच्या विचारावर विचार करायला शिकले पाहिजे तेव्हा आपण खऱ्या अर्थाने बाबासाहेबांची जयंती साजरी करू. असे आपले विचार मांडत उपस्थितानां मार्गदर्शन केले सदर कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून रमेश सूर्यवंशी हे हजर राहून आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश उजगरे यांनी खूप उत्कृष्ट केले

सदर कार्यक्रमास जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी हे वेगळ्याच आनंदात कार्यरत होते सदर कार्यक्रमात बहुसंख्येने जाणकार गावकरी मंडळीनी आवर्जून उपस्थित लावली सदर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांनी सर्व रसिक प्रेक्षक व गावकऱ्यांचे व विचार मंचावर वरील प्रमुख पाहुण्यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

# भाजपाच्या भुलथापांना बळी न पडता काँग्रेसचे हात बळकट करा श्रीमती वैशालीताई देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत एकुरगा येथे महिला मेळावा बैठक

लातूर :– प्रतिनिधी मोदी सरकारने पहिल्या पाच वर्षात सांगीतले होते कि, युवक युवतींना दोन कोटी नोकजया देणार आहोत. त्यानंतर म्हणाले बाहेरील काळा पैसा आणून देशातील गोरगरीब, शेतकजयांच्या खातावर १५ लाख टाकु आजपर्यत गोरगरीबांना, शेतकजयांना एकही रुपया मिळाला नाही. असे खोटे आशवासन देवून आपल्या भोळ्या जनतेला फसवण्याचे काम या सरकारने केले आहे. आता जनतेला माहीत आहे. मोदी सरकार फक्त थापा मारत आहे. त्यामुळे यांच्या भुल थापांना बळी न पडता कॉग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले. लातूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ लातूर तालुक्यातील एकुरगा येथे दि. २९ एप्रिल रोजी सकाळी नारायणराव पाटील यांच्या निवासस्थानी आयोजित महिला मेळाव्यात श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख बोलत होत्या. यावेळी सीमा सिरसागर, सुनिता अरळीकर, एकुरगा गावच्या सरपंच विठ्ठाबाई काशिंदे, सुजाता आडसुळ यांची



प्रमुख उपस्थिती होती.मोदी सरकाने वर्षाला दोन कोटी नोकजया दिल्या जातील, शेतकजयांचे उत्पन्न दुप्पट करु, युवा वर्गाला नोकरी देवू अशी आश्वासने सरकाने दिलेली होती.परंतू, यातील एकही आश्वासनाची पुर्तता केली नाही.उलट शेतकजयांचा शेतीमालाला कवडीमोल भाव मिळत आहे. गोर गरीबांची फसवणूक केली जात आहे, असे नमुद करुन श्रीमती वैशालीताई देशमुख पुढे म्हणाल्या, या भाजपाच्या लोकांनी शेवसेना पक्ष आणि राष्ट्रवादी पक्षाचे घर फोडले आहे. आणि आपली सत्ता केंद्रात स्थापन केली. त्याच बरोबर गोर गरीब, शेतकरी, महिला, युवक, युवती यांची फसवणूक केली आहे. या सरकारला त्यांची जागा दाखवण्याची वेळ आली आहे. कॉग्रेस पक्षाचे हात बळकट करावे लागेल. सरकारने नोट बंदी करुन सामान्य जनतेची दिशाभुल करत फसवणून केली. या मोदी सरकारने सामान्य नागरीकांना दिलेल्या आश्वासनांची पुर्तता केली नाही.काँग्रेस महाविकास आघाडीने एक सुशिक्षत आणि कार्यक्षम उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या रुपाने आपल्याला मिळाला आहे. डॉ. शिवाजी काळगे हे महिन्यातील एक दिवस मतदारसंघातील तालुक्यातील लोकासांठी देणार आहेत. काँग्रेस पक्षाने सर्वना गॅरंटी कार्ड दिले आहे. यात शेतकरी, शेतमजूर, महिला, युवक, बेरोजगारी यांच्याविषयी गॅरंटी दिली आहे. महिलांना दरमहा ८ हजार पाचशे, युवकांना पक्की नोकरी, शेतकजयांना शेतमालाची हमी घेतली आहे. या गॅरंटी कार्डवर स्वत: राहूल गांधी यांची स्वाक्षरी आहे. काँग्रेस महाविकास आघाडीची सत्ता येताच गॅरंटीची पुर्तता केली जाणार आहे. त्यामुळे महिला भगिणींनी आपल्या परिवारासह डॉ.शिवाजी काळगे यांचा मोठ्या मताधिक्यांनी विजयी करावयाचे आहे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी सुनिता अरळीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी मीरा पटाडे, विजयाबाई कोरले, कविता घुटे, प्रभावती नाटकळे, कोमल नाटकळे, प्रभा इंगळे, सगिता पटाडे, मनिषा घुटे, सिंधूबाई घुटे, पकंज पटाडे, दिनकर इंगळे, विठ्ठबा घुटे, विष्णू पटाडे, महादेव नाटकळे, नंदु नाटकळे, विश्वनाथ पाटील आदींची उपस्थिती होती. सुत्रसंचालन आणि आभार नारायनराव पाटील यांनी केले.

# वस्तू सेवा कर आयुक्त कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती जल्लोषात साजरी

माझगाव मुंबई:– मागासवर्गीय वस्तू व सेवा कर अधिकारी कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे १३३ वी जयंती महोत्सव माजगाव मुंबई येथील कार्यालयात मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती मा. रमेश भूमे साहेब (अप्पर राज्य कर आयुक्त मुंबई) प्रमुख पाहुणे म्हणून मा. विश्वनाथ शेगावकर साहेब भा.प्र.से. (माजी प्रधान सचिव तामिळनाडू राज्य चेन्नई) यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना डॉक्टर बाबासाहेबांची कल्याणकारी राज्याची संकल्पना या विचारावर आपले विचार मांडले .



तसेच राज्य शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी– साहित्यिक. विचारवंत उत्तम दासु तरकसे आसरडोकर हे देखील सदर जयंती उत्सव समितीच्या आग्रास्तव सोहळ्यात वेळेत वेळ काढून हजर होते.

जयंती उत्सव समितीच्या वतीने उत्तम तरकसे साहेबांचा सन्मान करण्यात आला तसेच मा. श्री विश्वनाथ शेगावकर साहेब (आय.ए एस तामिळनाडू राज्य) यांनी स्वतः लिहिलेले पुस्तक उत्तम तरकसे यांना भेट देत त्यांचा सन्मान करण्यात आला.

सदर कार्यक्रमास रवींद्र मंडपे, विवेक घोडके, सुजाता काळे, सतीश काकडे तसेच मागासवर्गीय वस्तू व सेवा कर अधिकारी कर्मचारी आजी–माजी सर्वच अधिकारी कर्मचारी हे आपल्या परिवारासह खूप मोठ्या संख्येने हजर होते कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE